# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/१९८

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील बारावी सभा शुक्रवार दिनांक २५ ऑक्टोबर, 2024 तसेच सौर दिनदर्शिकेनुसार ३ कार्तिक, शके १९४६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ येथे हायब्रीड पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली :**

**नीला उपाध्ये**

ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट समीक्षक आणि लेखिका नीला उपाध्ये यांचे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७९ वर्षांच्या होत्या.

**भा. ल. महाबळ**

ज्येष्ठ लेखक भा. ल. महाबळ यांचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**काळूराम धोडादे**

आदिवासीचे प्रेरणास्थान तसेच भूमीसेना व आदिवासी एकता परिषदेचे संस्थापक, आदिवासी मित्र पुरस्काराने सन्मानित काळूराम धोडादे यांचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**डॉ. विनायक श्रीखंडे**

पोटविकार शल्यचिकित्सक डॉ. विनायक श्रीखंडे यांचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**आनंद म्हसवेकर**

ज्येष्ठ नाटककार, लेखक आनंद म्हसवेकर यांचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**भालचंद्र देशपांडे**

ज्येष्ठ नाटककार, लेखक भालचंद्र देषपांडे यांचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**अतुल परचुरे**

हरहुन्नरी अभिनेते अतुल परचुरे यांचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७वर्षांचे होते.

**अशोक प्रधान**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरु, प्राध्यापक अशोक प्रधान यांचे दिनांक १५ ऑक्टोबर,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**पं. वसंतराव गाडगीळ**

'शारदा ज्ञानपीठम्'चे संस्थापक पं. वसंतराव गाडगीळ यांचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**मंगेष कुलकर्णी**

ज्येष्ठ अभिनेते, लेखक, गीतकार मंगेष कुलकर्णी यांचे दिनांक १९ ऑक्टोबर,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

## संतोष मोहिते

मुंबई विद्यापीठातील सुरक्षा विभागातील कर्मचारी श्री. संतोष मोहिते दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ४८ वर्षांचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणे. | EAU |
| ठराव | दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DoICT) हे पद भरण्याकरिता दैनिक वृत्तपत्रात जाहिरात पुनःप्रसिद्ध करण्यास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत. | HRDC |
| ठराव | संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DoICT) हे पद भरण्याकरिता दैनिक वृत्तपत्रात जाहिरात पुनःप्रसिद्ध करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. | |
| ३ | Approval of the syllabus for the course on Personal Finance. | MSEUM |
| ठराव | It was resolved that the recommendations made by the Academic Council for approval of following new syllabus as per NEP format is accepted with effect from Academic year 2024-25.<br>AC-20/04/2024<br>9.6 — To consider the recommendations made by the Board of Deans at its meeting held on 18th April, 2023 vide on 10.1 (N) to introduce value added Certificate Course on Personal Finance as per NEP 2020 along with Ordinances, Regulation and syllabus of as per appendix with effect form the academic year 2024-25.<br>It was resolved that the recommendations made by the Board of Deans at its meeting held on 18th April, 2023 vide item no.10.1 (N) to introduce value added Certificate on Personal Finance as per NEP 2020 along with Ordinances, Regulation and Syllabus be accepted as per appendix with effect from the academic year 2024-25 and the same be recommended to the Management Council. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | Approval for Diploma in Nature Resource Management. | MSEUM |
| ठराव | It was resolved that the recommendations made by the Academic Council for approval of following new syllabus as per NEP format is accepted with effect from Academic year 2024-25.<br>AC-20/04/2024<br>9.6 — To consider the recommendations made by the Board of Deans at its meeting held on 18th April, 2023 vide on 10.2 (N) to introduce value added Diploma in Natural Resource management (which was earlier titled as Diploma in Community Resource Management) as per NEP 2020 along with Ordinances, Regulation and syllabus of as per appendix with effect from the academic year 2024-25.<br>It was resolved that the recommendations made by the Board of Deans at its meeting held on 18th April, 2023 vide item no.10.2 (N) to introduce value added Diploma in Natural Resource management (which was earlier titled as Diploma in Community Resource Management) as per NEP 2020 along with Ordinances, Regulation and Syllabus be accepted as per appendix with effect from the academic year 2024-25 and the same be recommended to the Management Council. | |
| ५ | The matter to collaborate with the NRP to set up an examination Centre in University of Mumbai is being placed before the Management Council for its consideration. | AAQA |
| ठराव | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्र क्रमांक:डीओ.नं.१-१/२०२४(e-Gov.),दिनांक १९ जुलै, २०२४ नुसार नेशनल रिक्रुटमेंट एजेन्सी ह्यांनी मुंबई विद्यापीठात कॉम्पुटर बेस्ड टेस्ट सेंटर सुरु करण्यासाठी विनंती केली आहे. याबाबत व्यवस्थापन परिषदेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती ह्या विषयासंबंधी अधिक अभ्यास करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली.<br>१) प्रा. शिवराम गर्जे (अध्यक्ष)<br>२) प्रा. कविता लघाटे (सदस्य)<br>३) प्रा. पुजा रौंदळे (सदस्य)<br>समितीने तयार केलेला अहवाल मा. कुलगुरूंना सादर करण्यात येईल. | |

| | | |
|---|---|---|
| ६ | शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयास अतिरिक्त वाढीव जागा देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेचा अभिप्राय देण्यात यावा हि विंनती. | AEM |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी सिद्धार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालयास अतिरिक्त वाढीव जागा देण्याबाबत प्रस्ताव अमान्य करण्यात आला. | |
| ७ | Post-Facto permission is requested from the MC Board of accept the sponsorship from Alumni of the Jamanalal Bajaj Institute of Management Studies. | JBIMS / IQAC /NRF / PRO (Quarterly report) |
| ठराव | जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यांच्या माजी विद्यार्थी संघटने द्वारे सदर संस्थेसाठी ३ एअर कंडिशनर (रुपये दोन लाख फक्त) व संस्थे मधील माजी विद्यार्थी संघटना कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी (रुपये सात लाख फक्त) कार्योत्तर परवानगी देण्यात आली. | |
| ८ | 1) Extension of Project NO.S221064MPMH of NICSI for 18 (eighteen) manpower for a period of six months.<br>2) Advance payment to be made to NICSI of Rs. 60,80,570.951/- for the said period.<br>3) Additional five manpower of Level -1. | DICT-CCF |
| ठराव | १) पुढील सहा महिन्यासाठी सदर (NO.S221064MPMH) प्रोजेक्टला मुदत वाढ देण्यात आली.<br>२) नेशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर सर्व्हिसेस इन्कॉर्पोरेटेड यांना रुपये साठ लाख ऐंशी हजार पाचशे सत्तर फक्त (६०,८०,५७०.९५१/-) वेतन अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आली.<br>३) सदर बाब अधिक माहितीसह पुनः सादर करावी, असे ठरले. | |
| ९ | दिनांक १ ते ४ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्या मधील कसोटी सामन्यासाठी विद्यापीठ क्रीडा मैदानातील गेट क्र.४ दिनांक १ ते ४ नोव्हेंबर, २०२४ या दिवशी खुले करून प्रेक्षकांसाठी प्रवेश देणेबाबत व दिनांक २८ ऑक्टोबर, २०२४ ते ६ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान बास्केटबॉल कोर्ट मध्ये तात्पुरत्या स्वरूपात सॅटेलाईट व जनरेटर वाहन ठेवण्यासाठी परवानगी देणे तसेच याबाबत सेवाशुल्क निश्चित करणे बाबत. सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | Sports Dept. |
| ठराव | दिनांक १ ते ४ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्या मधील कसोटी सामन्यासाठी विद्यापीठ क्रीडा मैदानातील गेट क्र.४ दिनांक १ ते ५ नोव्हेंबर, २०२४ या दिवशी खुले करून प्रेक्षकांसाठी प्रवेश देण्यासाठी प्रतिदिन रुपये २,००,०००/- सेवाशुल्क अधिक १८% जीएसटी घेण्यात यावे, असे ठरले. तसेच दिनांक २८ ऑक्टोबर, २०२४ ते ६ नोव्हेंबर, २०२४ दरम्यान बास्केटबॉल कोर्ट मध्ये तात्पुरत्या स्वरूपात सॅटेलाईट व जनरेटर वाहन ठेवण्यासाठी प्रतिदिन रुपये ४०,०००/- सेवाशुल्क अधिक १८% जीएसटी | |

| | | |
|---|---|---|
| | आकारण्यात यावी, असे ठरले.<br>दीक्षान्त सभागृह, खेळांचे मैदान, व विद्यापीठातील इतर सभागृहे सातत्याने शासनाच्या / इतर संस्थेच्या प्रयोजनार्थ भाड्याने द्यावे लागते. त्यामुळे वेळोवेळी भाडेदर वाढ करणे देखील अभिप्रेत आहे. भाडे वाढविण्याच्या दृष्टीने खालील समिती गठीत करण्यात आली. सदर समिती मध्ये निमंत्रित सदस्य बोलाविण्याचे अधिकार मा. प्र-कुलगुरूना देण्यात आले आहेत.<br>१) प्र-कुलगुरू (अध्यक्ष)<br>२) श्री. शेषाद्री चारी (सदस्य)<br>३) श्री. संदीप सिंग (सदस्य)<br>४) श्री. नागरगोजे (सदस्य)/ सेवा निवृत्त अधिकारी - सार्वजनिक बांधकाम विभागात<br>५) कुलसचिव (सदस्य सचिव) | |
| १० | श्री. सं.रा. उतेकर, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.इ.८६०४२१/वि.शि.-१, दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ नुसार विद्यापीठ व महाविद्यालये यांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदावरील नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत किंवा राज्य सरकारने स्थापन केलेल्या समकक्ष मंडळातर्फे बाबत अभिप्राय देण्याची विनंती केली आहे, सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | कुलसचिवांचे कार्यालय |
| ठराव | सदर बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली, चर्चेअंती असे ठरले की विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिक्षक भरती संबंधी दिनांक १८ जुलै २०१८ रोजी प्रकाशित झालेले केंद्र शासनाचे राजपत्रानुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, मधील कलम १०२(४) व (५), दिनांक १० मे, २०१९ रोजीचा महाराष्ट्र शासन निर्णय, तसेच विविध परिनियम हे विद्यापीठास बंधनकारक आहेत, असे अभिप्राय कळविण्यात यावेत. | |
| ११ | दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | FAO |
| ठराव | दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |

मुंबई विद्यापीठाचे वार्षिक दीक्षान्त समारंभ दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात होणार आहे. समारंभाचे अध्यक्षस्थान राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन भूषवणार आहेत. समारंभाला केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर हे प्रमुख म्हणून लाभले आहेत. अशी माहिती मा. कुलगुरूंनी सभागृहाला दिली.

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू